# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर शहरात कार्यरत असलेल्या विंधन विहिरींची सुस्थिती व
**{सार्व.आ.अभि.विभाग }** दुरूस्तीचे कामाकरीता प्रथम वर्ष ऑगस्ट २०२४ ते ऑगस्ट २०२५ व द्वितीय वर्ष ऑगस्ट २०२५ ते ऑगस्ट २०२६ या दोन वर्षाकरिता येणारा रू. २,५८,६३,६१२/- खर्चास (GST सह) प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. तसेच सदर कामाकरिता रितसर निविदा बोलावण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे. सदर कामाकरीता येणारा खर्च म.न.पा.चे आय व्यय पद क्र. ४१६ (A-४३८०१९४०७०१) अंतर्गत प्रस्तावित आहे.

टिप:- सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 895/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 09/07/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरात कार्यरत असलेल्या विंधन विहिरींची सुस्थिती व दुरूस्तीचे कामाकरीता प्रथम वर्ष ऑगस्ट २०२४ ते ऑगस्ट २०२५ व द्वितीय वर्ष ऑगस्ट २०२५ ते ऑगस्ट २०२६ या दोन वर्षाकरिता येणारा रू. २,५८,६३,६१२/- खर्चास (GST सह) प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. तसेच सदर कामाकरिता रितसर निविदा बोलावण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली. (सदर कामाकरीता येणारा खर्च म.न.पा.चे आय व्यय पद क्र. ४१६ (A-४३८०१९४०७०१) अंतर्गत प्रस्तावित आहे.)